जा.क्र./वि.शा./स.सा.क्र./२३५५/२०१६
पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर
दिनांक :- ०५/०७/२०१६

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
ठाणे.

विषय :- ध्वनी प्रदुषण तक्रारी स्विकारण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन गृह विभाग डीआयएस ०९१/प्र.क्र ४३४/वि.शा १ ब/ दि. १४/०६/२०१६
२) पोमस २४/३४/जनहित याचिक/१७३/२०१०/२४०/२०१५ दि. २७/०६/२०१६

—००—

उपरोक्त विषय व संदर्भान्वये मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशान्वये ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरीता १४ जुलै २०१५ रोजीच्या गृह विभागाच्या शासन गृह विभाग डीआयएस ०९१/प्र.क्र ४३४/वि.शा १ ब अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या तरतुदी अर्तगत ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरिता पोलीस अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदरचे अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब दिनांक ०६/०५/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. ती यासोबत जोडलेली आहे.

सदर अधिसुचनेच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्त परिसरात सर्व पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विभागीय स्तरावर सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळीय स्तरावर पोलीस उप आयुक्त यांना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. त्यांची पद, कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ई मेल आयडी याबाबतची माहिती जिल्हाधिकारी, महानगरपालिका, नगरपालिका यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांच्या वार्ड कार्यालयामधील सुचना फलकावर स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने दर्शविण्यात यावी, असे सदर अधिसुचनेमध्ये नमूद आहे.

तरी ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात प्राधिकृत अधिकारी सर्व पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विभागीय स्तरावर सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळीय स्तरावर पोलीस उप आयुक्त कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ई मेल आयडी यासोबत जिल्हाधिकारी, ठाणे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी जोडलेली आहे. तरी सदरची प्राधिकृत अधिकाऱ्यांची माहिती प्रसिध्द व्हावी.

(डॉ.डि.एस.स्वामी)
पोलीस उप आयुक्त, वि.शा., ठाणे
पोलीस आयुक्त, ठाणे करिता

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
शाखा ........ क्रमांक........
-5 JUL 2016
नि.उ.जि./उ.जि.(सा.प्र.) जिल्हाधिकारी

Collector Office, Thane
05/07/2016
CTH/16/30930
L1467720713901